Shivaji College Hingoli
Dist Hingoli

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA



Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - II

Impact Factor / Indexing
2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

Shivaji College Hingoli Dist. Hingoli

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VIII Issue - I Marathi Part - II January - March - 2019

Peer Reviewed Referred and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖

Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

Shivaji College Hingoli Dist. Hingoli

# EDITORIAL BOARD


**Professor Kaiser Haq**
Dept. of English, University of Dhaka,
Dhaka 1000, Bangladesh.

**Roderick McCulloch**
University of the Sunshine Coast,
Locked Bag 4, Maroochydore DC,
Queensland, 4558 Australia.

**Dr. Ashaf Fetoh Eata**
College of Art's and Science
Salmau Bin Adbul Aziz University. KAS

**Dr. Nicholas Loannides**
Senior Lecturer & Cisco Networking Academy Instructor,
Faculty of Computing, North Campus,
London Metropolitan University, 166-220 Holloway Road,
London, N7 8DB, UK.

**Muhammad Mezbah-ul-Islam**
Ph.D. (NEHU, India) Assot. Prof. Dept. of
Information Science and Library Management
University of Dhaka, Dhaka - 1000, Bangladesh.

**Dr. Meenu Maheshwari**
Assit. Prof. & Former Head Dept.
of Commerce & Management
University of Kota, Kota.

**Dr. S. Sampath**
Prof. of Statistics University of Madras
Chennari 600005.

**Dr. D. H. Malini Srinivasa Rao**
M.B.A., Ph.D., FDP (IIMA)
Assit. Prof. Dept. of Management
Pondicherry University
Karaikal - 609605.

**Dr. S. K. Omanwar**
Professor and Head, Physics,
Sat Gadge Baba Amravati
University, Amravati.

**Dr. Rana Pratap Singh**
Professor & Dean, School for Environmental
Sciences, Dr. Babasaheb Bhimrao Ambedkar
University Raebareily Road, Lucknow.

**Dr. Shekhar Gungurwar**
Hindi Dept. Vasantrao Naik
Mahavidyalaya Vasarni, Nanded.

**Memon Sohel Md Yusuf**
Dept. of Commerece, Nirzwa College
of Technology, Nizwa Oman.

**Dr. S. Karunanidhi**
Professor & Head,
Dept. of Psychology,
University of Madras.

**Prof. Joyanta Borbora**
Head Dept. of Sociology,
University, Dibrugarh.

**Dr. Walmik Sarwade**
HOD Dept. of Commerce
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada
University, Aurangabad.

**Dr. Manoj Dixit**
Professor and Head,
Department of Public Administration Director,
Institute of Tourism Studies,
Lucknow University, Lucknow.

**Prof. P. T. Srinivasan**
Professor and Head,
Dept. of Management Studies,
University of Madras, Chennai.

**Dr. P. Vitthal**
School of Language and Literature
Marathi Dept. Swami Ramanand
Teerth Marathwada University, Nanded.


PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - II



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | महिलांचे राजकीय प्रतिनिधित्व व आरक्षण विधेयक - एक अभ्यास<br>डॉ. सुखनंदन ढाले | १-६ |
| २ | परभणी महानगरपालिका निवडणूक विश्लेषण<br>प्रा. डॉ. सुरेश भालेराव<br>प्रा. डॉ. सुनिल शिंदे | ७-९ |
| ३ | भारतीय निवडणुका : जात आणि धर्माचे राजकारण<br>प्रा. डॉ. सूर्यकांत माधवराव सांभाळकर | १०-१५ |
| ४ | धर्म आणि जातीचे राजकीयीकरण<br>सुवर्णा ज्ञानेश्वर सोनुने | १६-१८ |
| ५ | भारतीय लोकशाही समोरील नवीन राज्य निर्मितीचे आव्हान<br>डॉ. स्वप्नील बोधणे | १९-२१ |
| ६ | भारतीय राजकारणात धर्म व जातींचा प्रभाव<br>डॉ. उमाकांत राठोड | २२-२४ |
| ७ | निवडणूक सुधारणा : ई.व्ही.एम. मशीन<br>प्रा. डॉ. व्ही. एन. ठाले<br>प्रा. डॉ. डी. जे. येरमुले | २५-२९ |
| ८ | महिलांच्या राजकारणातील सहभाग<br>विजय अर्जुन पट्टेबहादूर | ३०-३३ |
| ९ | महिलां राजकीय आरक्षण विधेयकाचे राजकारण आणि सद्यस्थिती<br>प्रा. डॉ. विलास आघाव | ३४-३९ |
| १० | स्थानिक स्वराज्य संस्थेतील महिला प्रतिनिधित्व आणि महिला सबलीकरण<br>डॉ. संगमेश्वर निला | ४०-४६ |
| ११ | भारतीय लोकशाही प्रक्रिया आणि निवडणुका<br>प्रा. कमलाकर शरद इंगळे | ४७-४९ |
| १२ | जनमत चाचण्यांची सद्यस्थिती आणि विश्वासाहर्यता<br>डॉ. बालासाहेब किलचे | ५०-५५ |



PRINCIPAL
Shivaji College
Hingoli, Dist. Hingoli

VOLUME - VIII, ISSUE - I, JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# १. महिलांचे राजकीय प्रतिनिधित्व व आरक्षण विधेयक – एक अभ्यास

डॉ. सुखनंदन ढाले
राज्यशास्त्र विभाग प्रमुख, शिवाजी महाविद्यालय, हिंगोली.

## प्रस्तावना

सामाजिक न्यायाच्या प्रस्थापनेसाठी आणि मागासलेल्या दूर्बल समाज घटकाला सामाजिक प्रवाहात सहभागी करून घेण्याच्या हेतूने आरक्षण धोरणाचा स्वीकार केला आहे. २१ व्या शतकात भारतामध्ये आरक्षण या विषयावर चर्चा होतांना दिसून येते. समानता आणि सामाजिक न्याय या सामाजिक मूल्यांच्या आधारे संतुलित समाज निर्माण करण्याच्या अनेक मार्गापैकी आरक्षण हा एक मार्ग आहे. वर्ण, वर्ग, जात, लिंग यामुळे वर्षानुवर्षे संधीपासून व हक्कापासून वंचित असलेल्या दलित, आदिवासी, इतर मागासवर्गीय आणि महिला यांना सकारात्मक लाभ प्राप्त होऊन त्यांचा विविध क्षेत्रात सहभाग वाढत आहे. सामाजिक, शैक्षणिक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या घटकांना इतर पुढारलेल्या वर्गाच्या बरोबरीने येण्यासाठी विशेष संधी उपलब्ध करून देणे ही आरक्षणाची मुळ भूमिका आहे आणि या भूमिकेतूनच आरक्षण हे मानवी मूल्य संपूर्ण जगभर मान्य झाले आहे. प्रत्येक देशामध्ये आरक्षण अस्तित्वात आहे. अमेरिका, दक्षिण आफ्रिकेमध्ये निग्रोसाठी आरक्षण आहे. आरक्षण हे त्या देशातील धार्मिक, सामाजिक, आर्थिक परिस्थितीनुसार लागू करण्यात आले आहे. आरक्षणाची पद्धत संपूर्ण जगभर वेगळी असली तरी सामाजिक समता प्रस्थापित करणे हे त्याचे उद्दिष्ट आहे.

भारतात मागासवर्गीयांना विशेष संरक्षण देण्याचा इतिहास सव्वाशे वर्षाचा आहे. १८८५ मध्ये ब्रिटीश सरकारने मद्रास राज्यात मागासवर्गीय विद्यार्थ्यासाठी शैक्षणिक सवलती सुरू केल्या.१ त्यानंतर मागासवर्गीयांच्या उन्नतीसाठी अनेक आयोग नेमले. महात्मा फुले, त्यागराज चेट्टीयार, डी.टी.एम.नायर यासारख्या समाजसुधारकांनी ब्रिटीश सरकारला मागासवर्गीयाच्या परिस्थितीची जाणीव करून दिली. त्यामुळे ब्रिटीश सरकारने मागासवर्गीय जनतेला खास संरक्षण दिले. याच काळात देशातील सुधारणावादी संस्थांनामध्ये मागासवर्गीयांना नोकऱ्यात राखीव जागा व शिक्षणासाठी विशेष सवलती देऊन त्यांच्या विकासाला चालना दिली. कोल्हापूर, बडोदा, म्हेसूर या संस्थानाचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागतो.

स्वातंत्र्योत्तर काळात भारताची नवी राज्यघटना अस्तित्वात आली. संविधानामध्ये सामाजिकदृष्ट्या दूर्बल समाजघटकाला विशेष संधी देण्याचा विचार केला आहे. १९९३ मध्ये संविधानात ७३ व ७४ वी घटनादुरूस्ती झाली. या घटनादुरूस्तीने अनुसूचीत जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग आणि महिला यांच्याकरीता स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये राखीव जागा हे तत्व स्वीकारले.२ यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये या घटकांचे प्रतिनिधीत्व आणि सहभाग मोठ्या प्रमाणात वाढला आहे. तसेच निर्णय निर्धारण प्रक्रियेतील त्यांचा सहभाग वाढतांना दिसत आहे. एका अर्थाने सामाजिक क्रांती आरक्षणाने घडवून आणली आहे.



PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

स्त्रीवादी राजकारण

भारतीय समाजात हजारो वर्षापुर्वीपासून स्त्री-पुरूष भेदभाव आहे. आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रात स्त्रीला दुय्यम स्थान असल्याने तिची प्रगती खुटली आहे. सामाजिक रूढी, प्रथा, परंपरा यामुळे महिलांची स्थिती दयनीय होती. यामुळेच १९ व्या शतकात राजा राममोहन रॉय, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, महर्षी कर्वे, गो. ग. आगरकर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने समान हक्क आणि संधी मिळाव्यात यासाठी लढा सुरू केला त्यातून त्यांचे मागासलेपण भरून काढण्यासाठी स्त्रियांसाठी काही विशेष कायदे व सवलती असाव्यात हा विचार पुढे आला. त्यादृष्टीने भारत सरकारने काही प्रयत्न केले. स्त्रियांना मोफत शिक्षण आर्थिक दर्जा सुधारण्यासाठी काही विशेष योजना त्यासाठी पैशाची तरतूद, स्त्रियांवर होणारे अन्याय रोखण्यासाठी काही कायदे करण्यात आले. परंतु हे कायदे करणारे व जाहीर करणारे जे कायदेमंडळ आहे त्यामध्ये महिला प्रतिनिधीत्वाचे प्रमाण अत्यल्प असून तेथे पुरूष प्रतिनिधींचे वर्चस्व आहे. यामुळे लोकशाही व्यवस्था असलेल्या भारतात स्त्रियांची स्थिती कायम राहिली आहे. राजकीय पक्षात पुरूषप्रधानता असल्याने स्त्रीला उमेदवारी देऊन निवडून आणण्यासाठी फारसे प्रयत्न झाले नाहीत. परंतु १९८० च्या दशकात स्त्री चळवळीने सत्ता, राजकारण आणि राजकीय व्यवस्थेचे पुरूषसत्तावादी विश्लेषण करून स्त्री प्रश्नांना राजकीय चर्चेत आणले. लोकशाहीतील प्रतिनिधीक संस्थाचे पुरूषसत्ताक वर्चस्व विश्लेषित केले. नागरिकत्वाच्या संकल्पना, कायदे याची समीक्षा केली. या मागणीतून समोर आलेले स्त्रीवादी राजकारण महिला आरक्षणाच्या मागणीस प्रेरणा देणारे ठरले.१

**महिला आरक्षणाची उद्दिष्टे**

१) भारतामध्ये स्त्री-पुरूष यांच्यात राजकीय समानता स्थापन करणे.

२) धोरणात्मक निर्णय प्रक्रियेत महिलांना महत्वाची भूमिका बजावण्यासाठी आवश्यक सहभाग देणे.

३) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय व दूर्बल घटकातील महिलांना प्रतिनिधीत्व करण्याची संधी देणे.

४) पुरूषप्रधान राजकीय संस्कृतीला पर्याय निर्माण करणे.

५) महिला सबलीकरणाच्या प्रक्रियेला गती देणे.

६) महिलांमध्ये राजकीय जागृती करणे.

७) महिलांच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय अडचणी सोडवणे.२

अशा प्रकारची उद्दिष्टे महिला आरक्षणामागे आहेत.

**राजकीय आरक्षणाचा इतिहास**

भारतात महिलासाठी राखीव जागा ठेवण्याची मागणी १९३१ च्या गोलमेज परिषदेत श्रीमती सुब्बरायण आणि शहानवाज यांनी स्त्रियांसाठी स्वतंत्र (धर्मनिरपेक्ष) मतदारसंघाची मागणी केली होती. परंतु या मागणीला अखिल भारतीय परिषदेने विरोध केला. विभक्त मतदारसंघाला महात्मा गांधीचाही विरोध होता. सरोजिनी नायडू यांनी महिला आरक्षण

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli Dist. Hingoli

"राजकीय दर्जात पुर्ण समानता असणे आवश्यक आहे या आपल्या सार्वत्रिक निर्णयाशी प्रतारणा केल्यासारखे आहे, असे म्हटले होते."३ तरीही १९३७ च्या प्रांतिक मंडळावर निवडून गेलेल्या ५६ महिलापैकी ४१ महिलांना आरक्षणाचा आधार होता आणि ५ स्त्रियांची नियुक्ती केली होती. पुढे 'चले जाव' आंदोलनात हा मुद्दा बाजूला पडला आणि स्वातंत्र्याबरोबर १९४७ मध्ये जेव्हा स्त्रियांना मतदानाचा समान हक्क मिळाला तेव्हा तो काहीसा विसरून गेला.४

१९५२ च्या सार्वत्रिक निवडणूकीनंतर स्थापन झालेल्या पहिल्या लोकसभेतील स्त्री प्रतिनिधीत्वाचे प्रमाण ४.४ टक्के होते. १९७० च्या दशकापर्यंत हा आलेख संथगतीने वाढत राहिला. १९७० च्या दशकात इंदिरा गांधी यांच्या एकल्ली नेतृत्वामुळे आणि लोकशाहीचा अभाव यामुळे लोकसभेतील महिला प्रतिनिधीत्व घटलेले दिसून येते. महिलांना पक्षात स्थान मिळणे कठीण बनले त्यामुळे या काळात महिला प्रतिनिधीत्वात घट झालेली दिसून येते.

**लोकसभेतील महिला प्रतिनिधीत्व**

तक्ता क्र. १

| अ.क्र. | लोकसंख्या | एकूण सदस्य | महिला सदस्य | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | १९५२-५७ | ४९९ | २२ | ४.४ |
| २ | १९५७-६२ | ५०० | २७ | ५.७ |
| ३ | १९६२-६७ | ५०३ | ३४ | ६.७ |
| ४ | १९६७-७० | ५२३ | ३१ | ५.९ |
| ५ | १९७०-७७ | ५२१ | २२ | ४.२ |
| ६ | १९७७-७९ | ५४४ | १९ | ३.४ |
| ७ | १९८०-८४ | ५४४ | २८ | ५.१ |
| ८ | १९८४-८९ | ५४४ | ४४ | ८.१ |
| ९ | १९८९-९१ | ५२९ | २८ | ५.२ |
| १० | १९९१-९६ | ५१४ | ३९ | ७.१ |
| ११ | १९९६-९७ | ५४३ | ४० | ७.२ |
| १२ | १९९८-९९ | ५४३ | ४४ | ८८ |
| १३ | १९९९-२००४ | ५४३ | ४९ | ९.२ |
| १४ | २००४-०९ | ५४३ | ४६ | ८.२ |
| १५ | २००९–२०१४ | ५४३ | ५९ | १०.८६ |
| १६ | २०१४- ।. | ५४३ | ६१ | ११.२३ |

आधार - statistics on women in India, Published on National Institute of Public Co-operation & child Development, New Delhi

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

लोकसभेबरोबर राज्यसभेतही महिला प्रतिनिधींत्वाचे प्रमाण

राज्यसभेतील महिला प्रतिनिधीत्व खालील तक्त्यात दर्शवले आहे

राज्यसभेतील महिला प्रतिनिधीत्व

तक्ता क्र. २

| अ.क्र. | राज्यसभा | एकूण सदस्य | महिला सदस्य |
|---|---|---|---|
| १ | १९५२ | २१६ | १५ |
| २ | १९५६ | २३२ | २० |
| ३ | १९६० | २३६ | २४ |
| ४ | १९६४ | २३८ | २१ |
| ५ | १९६८ | २४० | २२ |
| ६ | १९७० | २४० | १४ |
| ७ | १९७२ | २४३ | १८ |
| ८ | १९७४ | २४३ | १७ |
| ९ | १९७८ | २४४ | २५ |
| १० | १९८२ | २४४ | २४ |
| ११ | १९८६ | २४४ | २८ |
| १२ | १९९० | २४५ | २४ |
| १३ | १९९३ | २३३ | १७ |
| १४ | १९९८ | २४५ | १८ |
| १५ | २००४ | २४५ | २५ |
| १६ | २००९ | २४५ | २१ |
| १७ | २०१४ | २५० | २८ |

आधार -statistics on women in India Published on National Institute of Pub... operation & child Development , New Delhi

वरील तक्त्यातील माहितीनुसार १९५२ मध्ये राज्यसभेच्या २१६ जागा होत्या. त्यापैकी १५ महिला सदस्य... २००४ मध्ये राज्यसभेचे २४५ सदस्य होते. त्यामध्ये वाढ झाली नाही. यामुळे याकाळात अनेक महिला आघाड्यां... गालेला दिसून येतो. त्यामधूनच शेतकरी सघटनेतील महिला आघाडी, कम्युनिष्ट पार्टी ऑफ इंडीयाची महिला आघा... इंडीया डेमॉक्रॅटिक विमेन्स अशोशिएशन इत्यादीचा उदय झालेला दिसतो.५ लोकसभा आणि राज्यसभा तसेच घटक...



PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5** (www.sjifactor.com)

विधानसभेमध्ये महिला सहभागाचे प्रमाण अत्यल्प राहिले आहे. महाराष्ट्राच्या विधिमंडळातील राजकीय प्रतिनिधीत्व व सहभागाची स्थिती १९५२ ते २०१४ या काळात कशी होती हे खालील तक्त्यात दर्शवले आहे.

**विधानसभेतील महिला प्रतिनिधीत्व**

तक्ता क्र.३

| अ.क्र. | विधासभा गिवडणूक वर्ष | विधासभेतील एकूण सदस्य | महिला सदस्य | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | १९५२-५६ | २१६ | १५ | ४.७ |
| २ | १९५७-६२ | २३३ | ३० | १२.८ |
| ३ | १९६२-६७ | २६४ | १३ | ५.४ |
| ४ | १९६७-७२ | २७० | ०९ | ३.२ |
| ५ | १९७२-७७ | २७० | - | ०० |
| ६ | १९७८-८० | २८८ | ०८ | ३.५ |
| ७ | १९८०-८५ | २८८ | १९ | ६.९ |
| ८ | १९८५-९० | २८८ | १६ | ५.५ |
| ९ | १९९०-९५ | २८८ | ०६ | २.७ |
| १० | १९९५-९९ | २८८ | ११ | ४.१ |
| ११ | १९९९-०४ | २८८ | १२ | ४.४ |
| १२ | २००४-०९ | २८८ | १२ | ४.४ |
| १३ | २००९-१४ | २८८ | १० | ३.८ |
| १४ | २०१४- I.. | २८८ | १६ | ५.५ |

Source :- Statastic report ongeneral election १९६२-२००९ legeslative assembly or MaharastraElection Commion of India

वरील तक्त्यातील आकडेवारीवरून असे दिसून येते की, महाराष्ट्राच्या विधानसभेतील महिला सहभागाचे प्रमाण अत्यंत अल्प असे आहे. महाराष्ट्राच्या विधानपरिषदेतही महिला प्रतिनिधीत्वाची स्थिती विधानसभेसारखीच आहे.

१९५८ मध्ये पंचायतराज व्यवस्थेबाबत शिफारशी करतांना बलवंतराय मेहता समितीने ग्रामपंचायतीवर दोन महिलांची नियुक्त करावी अशी शिफारस केली होती. त्याप्रमाणे महाराष्ट्रात १९६१ पासून अशी तरतूद केली होती. पुढे १९७४ मध्ये स्त्रियांच्या परिस्थितीचा अभ्यास करून ती सुधारण्यासाठी कोणते उपाय करावेत हे "कमिटी ऑन स्टेटस ऑफ विमेन" या समितीच्या अहवालात मांडले होते. त्यामध्ये स्त्रियांच्या वेगळ्या पंचायती व स्वतंत्र पैशाची तरतुद करावी अशी शिफारस केली होती. वीणा मुजूमदार आणि लतिका सरकार यांच्या असहमतीमुळे महिला आरक्षणाच्या मागणीस नकार दिला गेला.६ १९८८ मध्ये राजीव गांधी यांनी "नॅशनल पर्सपेक्टिव्ह प्लॅन" द्वारा जिल्हा व पंचायत पातळीवर ३० टक्के महिला आरक्षणाची शिफारस केली होती. यानुसार महाराष्ट्रात १९९० मध्ये महिलांसाठी ३० टक्के आरक्षण देण्यात आले. यानंतर केरळ (१९९१), पश्चिम बंगाल (१९९२) इत्यादी राज्यामध्ये ग्रामपंचायतीपासून ते महानगरपालिकांमध्ये स्त्रियांसाठी जागा राखीव ठेवण्यासाठी



PRINCIPAL
Shivaji College
Hingoli, Dist. Hingoli

आपआपल्या कायद्यात सुधारणा केली.७ १९९३ मध्ये संविधानात ७३ वे ७४ वी घटनादुरूस्ती करून संस्थामध्ये ३३ टक्के आरक्षण दिले आहे. आज महाराष्ट्रात एक लाखापेक्षा जास्त महिला प्रतिनिधी आहेत. संस्थांमधील महिला प्रतिनिधीच्या सकारात्मक परिणामामुळे राज्य विधानसभा आणि संसदेतील प्रतिनिधी विधेयकाची मागणी महिला संघटना करतांना दिसतात. स्थानिक स्वराज्य संस्थामधील महिला प्रतिनिधी परिणामामुळे राज्य विधानसभा आणि संसदेतील प्रतिनिधीत्वासाठी महिला आरक्षण विधेयकाची मागणी होत आहे.

निष्कर्ष

१. भारतात महिलासाठी राखीव जागा ठेवण्याची मागणी १९३१ च्या गोलमेज परिषदेत श्रीमती सुब्बा बेगम शहानवाज यांनी स्त्रियांसाठी स्वतंत्र (धर्मनिरपेक्ष) मतदारसंघाची मागणी केली होती.
२. १६ व्या लोकसभेतील महिला प्रतिनिधीत्वाचे प्रमाण वाढलेले दिसून येते.
३. महाराष्ट्राच्या विधानसभेतील महिला सहभागाचे प्रमाण अत्यंत अल्प असे आहे.
४. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महिला प्रतिनिधीच्या सकारात्मक परिणामामुळे राज्य विधानसभा आणि प्रतिनिधीत्वासाठी आरक्षण विधेयकाची मागणी महिला संघटनाकडुन पुढे आली आहे.

संदर्भ सूची

१. जाधव तुकाराम, धुमाळे गणपत, महाराष्ट्र वार्षिकी २०१०, यूनिक ॲकेडमी, पुणे, पृ.क्र.७८८
२. भारंबे नंदकुमार, मानवी हक्क व विकास, निराली प्रकाशन, पुणे, चौथी सुधारीत आवृत्ती, पृ.क्र.३.१९
३. जाधव तुकाराम, धुमाळे गणपत, महाराष्ट्र वार्षिकी २०१०, यूनिक ॲकेडमी, पुणे, पृ.क्र.७८८
४. पाटील मनोज, नागरिकांसाठी केंद्र व राज्यशासनाच्या विकास योजना, चौधरी लॉ पब्लिशर्स, जळगाव आवृत्ती २०१०, पृ.क्र.१४५
५. पाटील मनोज, नागरिकांसाठी केंद्र व राज्यशासनाच्या विकास योजना, चौधरी लॉ पब्लिशर्स, जळगाव आवृत्ती २०१०, पृ.क्र.१४५
६. मुखर्जी मोनादिपा (मराठी आवृत्ती संपादक) स्त्री सबलीकरणाचे राष्ट्रीय धोरण, २००१, योजना वर्ष २००१, २००१,पृ.क्र.४६
७. मुखर्जी मोनादिपा (मराठी आवृत्ती संपादक) स्त्री सबलीकरणाचे राष्ट्रीय धोरण, २००१, योजना वर्ष २००१, २००१,पृ.क्र.४७
८. मुखर्जी मोनादिपा (मराठी आवृत्ती संपादक) स्त्री सबलीकरणाचे राष्ट्रीय धोरण, २००१, योजना वर्ष २००१, २००१,पृ.क्र.४७



PRINCIPAL
Shivaji College
Dist. Hingoli